मुंबई मेट्रो मार्ग ५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो रेल्वे मार्गिकेस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१६/प्र.क्र.१३९ /नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :

१.० मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ मे, २००४ रोजी झालेल्या ११० व्या बैठकीत दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी तयार केलेल्या मुंबई मेट्रो मार्गाच्या बृहत् आराखडयास आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या टप्प्यास मान्यता मिळाली. सदर बृहत आराखडयात एकुण ९ मेट्रो मार्ग असून त्यांची एकूण लांबी १४६.५० कि.मी. इतकी असून त्यांची अमंलबजावणी सन २०२१ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. सदर आराखडयातील मार्गांचे अंमलबजावणी धोरण निश्चित करतेवेळी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना त्यात काही बदल करण्यात आले. सुधारीत मेट्रो मार्ग बृहत आराखडयानुसार शासनाने मान्यता दिलेल्या १७२ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

मेट्रो मार्ग	तपशील	लांबी (कि.मी.)
१.	वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर	११.४०
२.	दहिसर-चारकोप -वांद्रे मानखुर्द	४०.००
३.	कुलाबा - वांद्रे - सिप्झ (अंधेरी)	३३.५०
४.	वडाळा - घाटकोपर - मुलुंड- ठाणे - कासारवडवली	३२.००
५.	ठाणे - भिवंडी-कल्याण	२३.१०
६.	सिप्झ - कांजूरमार्ग	१०.५०
७.	अंधेरी (पूर्व)- दहिसर (पूर्व)	१८.००
८.	शिवडी - प्रभादेवी	३.५०
	एकूण	१७२.००

२.० मेट्रो बृहत आराखड्यातील मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मेसर्स डापोलोनिया एस.पी.ए. व मेसर्स टाटा कन्सल्टींग सर्व्हिसेस लिमिटेड या सल्लागाराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर केलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालासह शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. सदर प्रकल्पाच्या प्रस्तावास राज्य शासनाकडून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांनी सादर केलेल्या मुंबई मेट्रो मार्ग ५ - ठाणे -भिवंडी -कल्याण (लांबी २४.९ कि.मी) या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) मेसर्स डापोलोनिया एस.पी.ए. आणि मेसर्स टाटा कन्सल्टींग सर्विसेस लि. यांनी सादर केलेल्या २४.९ कि.मी. लांबीच्या, १७ स्थानके असलेल्या उन्नत मुंबई मेट्रो मार्ग ५ ठाणे-भिवंडी-कल्याण (तपशील सोबत परिशिष्ठ-१ म्हणून जोडला आहे) या मेट्रो प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मेसर्स डापोलोनिया एस.पी.ए. आणि मेसर्स टाटा कन्सल्टींग सर्विसेस लि. यांनी अंदाजित केलेल्या मेट्रो मार्ग ५ करीता रु.८४१६.५१ कोटी इतक्या [सन २०१६ च्या भावपातळीनुसार (सर्व कर, दरवाढ, जमीन आणि बांधकाम दरम्यानचे व्याज रु.२० कोटी) इ. सह] किंमतीस मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्प मेट्रो कायदा, २००९ (सुधारीत) अंतर्गत राबविण्यास तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) सदर प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान मार्गिकांमध्ये (Alignment) तसेच स्थानकांमध्ये गरज भासल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो प्रकल्पाची वेळेत अंमलबजावणी करण्याकरीता धामणकर नाका उड्डाणपूल, भिवंडी येथील रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे निर्देश भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेला देण्यात देण्यात येत आहे.

६) कापुरबावडी येथे मेट्रो मार्ग ४ व मेट्रो मार्ग ५ यांचे एकात्मिकरण करण्याचे प्रस्तावित असुन सदर दोन्ही मार्गांचे अंतर्गत मार्ग बदल (Interoperable) करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर प्रकल्प अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाकडील स्वत:चा निधी व जागतिक बँक/ एशियन विकास बँक/जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था इ. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर एमएमआरडीएने घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

८) सदर प्रकल्पासाठी द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेणेसाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता त्यांचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही, या अटीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यात येत आहे.

९) देशातील विविध मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रशासनामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो तसेच केंद्र शासनाच्या सन २०१७ च्या मेट्रो रेल्वे धोरणानुसार निधी प्राप्त करून घेण्यासाठी सदर प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०) सदर प्रकल्पासाठी बाह्यसाहित कर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण घेणार आहे. तथापि, सदर कर्ज सहाय्यासाठी राज्यशासनामार्फत हमी देण्याची आवश्यकता भासल्यास, त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर राज्य शासनाकडून हमी देण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. सदर कर्जामुळे राज्यशासनावर कोणतेही अतिरिक्त दायित्व/जबाबदारी येणार नाही, याची खबरदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

११) सदर प्रकल्प द्विपक्षीय / बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय / आंतरदेशीय अशा विविध संस्थांकडून एमएमआरडीएला प्रत्यक्ष कर्ज उपलब्ध न झाल्यास, सदर कर्ज घेणेकरीता राज्य शासनाकडून हमीपत्र दिल्यास अशा कर्जाच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील. त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही, याची खबरदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांनी घ्यावी.

१२) सदर प्रकल्प माहे जुलै २०२१ पर्यंत पूर्ण करावयाचे उद्दिष्ट असल्याने, सदर प्रकल्पाचे स्थापत्य बांधकाम सुरुवातीला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा निधी वापरुन पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या रु. ३६४३.४७ कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे कर (५०%) आणि राज्य शासनाचे कर (१००%) व जमिनीचा खर्च मिळून राज्य शासनाकडून रु.१३५२.२५ कोटी व्याजासह परतफेड करावयाचे दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४) सदर प्रकल्पासाठी राज्यशासनाकडून दिले जाणारे दुय्यम कर्ज सहाय्य या कर्जाची परतफेड शासनाने निर्देशित केलेल्या अटीनुसार एमएमआरडीएकडून व्याजासह परत केली जाईल याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी.

१५) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१६) महसूल व वन विभागाने शासकिय जमिन २०१५/प्र.क्र.४५/ज-१, दिनांक ०१ जून, २०१५ अन्वये तसेच १ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यशासनाने प्रशासकिय मान्यता दिलेल्या व निकडीचे सार्वजनिक प्रकल्पासाठी शासकीय जमिनीच्या आगाऊ ताबा देण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून त्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठी शासकिय जमिन हस्तांतरणाबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे .

१७) सदर प्रकल्पाकरीता बहुपक्षीय/व्दिपक्षीय आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाकडून थेट कर्ज घेण्यास त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही, या अटीवर घेण्यास एमएमआरडीएस प्राधिकृत करण्यात येत आहे.

१८) सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एमएमआरडीए प्राधिकरणातर्फे सहभाग भागभांडवल उभारुन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्याचे कोणतेही अतिरिक्त दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही, त्याची पूर्णपणे एमएमआरडीएची जबाबदारी राहील, या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

१९) अशा प्रकल्पामधील मोठ्या प्रमाणात आवश्यक असलेली गुंतवणूक तसेच एमएमआरडीए प्राधिकरणाने यापूर्वी हाती घेतलेल्या प्रकल्पाकरिता लागणारा निधी विचारात घेऊन एमएमआरडीए प्राधिकरणाने त्यांचे सुयोग्य आर्थिक नियोजन करावे तसेच सदर प्रकल्प गुंतवणूकीकरीता योग्य असल्याचे खात्री एमएमआरडीएने करावी.

२०) सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मेट्रो मार्ग - ५ ठाणे-भिवंडी - कल्याण या मेट्रो मार्गाच्या एमएमआरडीए प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या भाडेदरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार वापरण्यास एमएमआरडीए प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच भाडे निश्चितीबाबतची जबाबदारी एमएमआरडीएची राहील.

२१) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता दुरुस्ती व देखभाल आगारासाठी एमआयडीसी (कोनगाव) येथील १५ हेक्टर जमीन व उपलब्धतेनुसार किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर जागा वापरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कायद्यानुसार आवश्यक ते वापर बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२२) मेट्रो मार्ग - ५ ठाणे - भिवंडी - कल्याण या मार्गिकेच्या परिसरातील अतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवासी/वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२३) सदर प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४) सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे व या दृष्टीने संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सुपूर्द करण्याबाबत त्या विभागांस निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२५) मेट्रो रेल्वे स्थानक व कारडेपोच्या व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२६) सदर मेट्रो प्रकल्पांतर्गतच्या प्रकल्पबाधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेची सहमती घेऊन "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणा (MUTP-R&R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

२७) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२८) मेट्रो मार्ग ५ ठाणे - भिवंडी - कल्याण हा मेट्रो प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२९) शासकीय/खाजगी संस्थांना मेट्रो प्रकल्प हा इतर प्रकल्पापेक्षा महत्वाचा असेल असे निर्देश देण्यास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यात येत आहे.

३०) सदर प्रकल्पासाठी "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्त्रोतामधुन उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी, भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कार्य व देखभाल (O&M) इ. साठी प्राधिकरणास वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे (कृपया परिशिष्ट-४ पहावे).

३१) मेट्रो मार्ग-२अ, २ब, ७ आणि मेट्रो मार्ग-४ च्या धर्तीवर मेट्रो मार्ग-५ मार्गाकरीता कार्य आणि देखभालाच्या (O & M) दरम्यान सुरक्षिततेसाठी तैनात करावयाचे सुरक्षारक्षक, आवश्यक साहित्य (जसे बंदूक, अश्रुधूर, श्वान पथक) इत्यादीचा पूरवठा आणि यावर येणारा खर्च हा प्राधिकरणाने करावा, असे निर्देश प्राधिकरणास देण्यात येत आहेत.

३२) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित आणि मुंबई उपनगरीय रेल्वेकरीता सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होत असून त्याच धर्तीवर महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाकडून मेट्रो प्रकल्पांकरीता सवलतीच्या दरात 'ना नफा - ना तोटा' या तत्वावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वीज उपलब्ध करुन देण्यासाठी विद्युत नियामक मंडळाकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३३) सदर प्रकल्पासाठी वीज उपलब्ध करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या धर्तीवर जास्तीत जास्त सौर ऊर्जा प्रणालीचा वापर करावा. तसेच यामध्ये महानिर्मितीचा समावेश करुन घ्यावा, अशा प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस / एमएमआरडीएस प्राधिकरणास सूचना देण्यात येत आहेत.

३४) प्रस्तावित मेट्रो मार्गिकेमध्ये काही बस स्थानके ही ठाणे आणि कल्याण-डोंबिवली महापालिका परिवहन सेवा यांच्या मालकी हक्काचे असून, याकरीता मेट्रोचे परिवहन सेवेशी एकात्मीकरण आणि बस डेपोचे वाणिज्यिक विकास करणे शक्य असून त्याबाबत तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

३५) मुंबई महानगर प्रदेशात प्रवाशांच्या सोयीसाठी प्राधिकरणामार्फत एकात्मिक तिकिटीकरण पध्दती (ITS) सुरु करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३६) सदर प्रकल्प द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील त्यामुळे शासनावर अतिरिक्त भार येणार नाही याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहे.

३७) सदर प्रकल्पासाठी बाह्यसाहित कर्ज शासनास उपलब्ध झाल्यास ते संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांना उपलब्ध करुन देतांना या कर्जाबाबतच्या अटी व शर्ती, मुद्दलाची परतफेड, व्याजाची परतफेड या बाबत दुय्यम कर्ज सहाय्य करारनामा (subsidiary Loan Agreement) करण्याची कार्यवाही करण्यात यावी तसेच सदर कर्ज व त्यावरील व्याज यांचे दायित्वाची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहे.

३८) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावी तथापि, स्वतंत्र अभिप्रायाची (Second opinion) वाट न पाहता निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात येत आहे व RFQ प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३९) सदर मेट्रो प्रकल्पाच्या बांधकाम दरम्यान होणारी वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठी वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय साधुन योग्य तो नाविन्यपुर्ण वाहतूक वळण (Innovative Traffic Diversion) नियोजन/आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार करावा तसेच प्रकल्पाचे बांधकाम कालावधी दरम्यान वाहतूकीची कोंडी होणार नाही याची काळजी एमएमआरडीएने घ्यावी, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहेत.

४०) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या कार्य प्रणाली चालन (O&M) साठी एक व्यवस्थापन व्यवस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार करावी, असे एमएमआरडीएस निर्देश देण्यात येत आहेत.

४१) सदर मार्गिका ईपीसी आधारावर राबवित असताना भूकंप प्रवणक्षेत्र आणि संभाव्य धोका पातळीच्या तीव्रतेनुसार क्षेत्र, पर्यावरणीय आकलन आणि प्रभाव तसेच आपत्कालीन किंवा आपत्तीच्या प्रसंगी करावयाची कार्यवाही तसेच याबाबतची विशिष्ट धोरणे, मार्गदर्शक तत्त्वे, संसाधन व्यवस्थापन योजना अहवालात समाविष्ट करावी व या बाबी हाताळण्याबाबतची प्रणाली निश्चित करण्याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी.

४२) सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या खाजगी जमिनीच्या संपादनावरील खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वहन करावा.

४३) रोलिंग स्टॉकच्या खरेदीमध्ये उच्च स्पर्धा व्हावी यासाठी डीएमआरसीचा अनुभव विचारात घेऊन जागतिक स्तरावर निविदा मागवून अथवा केंद्र शासन/राज्यशासन यांच्या प्रचलित धोरणानुसार एमएमआरडीएने कार्यवाही करावी.

४४) सदर प्रकल्पाचे प्रकल्प पूर्तीचे वेळापत्रक किंवा अशा स्वरुपाच्या यापूर्वी पूर्ण केलेल्या प्रकल्पांच्या प्रकल्प पूर्तीच्या वेळापत्रक विचारात घेऊन अपेक्षित आकस्मिक खर्च व राखीव निधीचे नियोजनाची बाब प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करताना एमएमआरडीएने विचारात घ्यावी.

४५) सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बांधकाम खर्च तसेच मेट्रो चलनवलन आणि देखभालीचा खर्च अवाजवी वाढणार नाही याची खबरदारी घेण्यास संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/ एमएमआरडीए यांनी घ्यावी.

४६) सदर प्रकल्पाच्या आयआरआरबाबतच्या गृहितकांची/माहितीची पुन्हा तपासणी करुन पडताळणी करावी व प्रकल्प गुंतवणूकीकरीता योग्य असल्याची खात्री एमएमआरडीएने करावी.

४७) सदर प्रकल्पाच्या प्रवाशी वाहतूक विषयक अंदाज, गृहितके व गणितीय विश्लेषण याची काळजीपूर्वक छाननी करून प्रकल्पाची आर्थिक व चलनवलनाची सुसाध्यता अबाधित राहील याची खबरदारी एमएमआरडीएने घ्यावी.

हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.९७२, दिनांक ०६.०३.२०१७ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.२४/अर्थबळ, दिनांक २०.०२.२०१७ अन्वये प्राप्त अभिप्राय व मंत्रिमंडळाने दिनांक २४/१०/२०१७ च्या बैठकित दिलेली मान्यता व त्यानंतर वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.२७२/व्यय-३, दिनांक २४.११.२०१७ नुसार दिलेली सहमती यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१७१२१६१४०११९०४२५** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shriram Dattatray Yadav

Digitally signed by Shriram Dattatray Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9da0e03bd84c1e17d78ad320814d003150fbf7d2abd36f924e5705145bf0e270, cn=Shriram Dattatray Yadav
Date: 2017.12.28 11:12:39 +05'30'

(श्रीराम यादव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
६. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. प्रधान सचिव (पदुम), कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१५. प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१६. प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१७. प्रधान सचिव पर्यावरण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९. सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२०. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२१. नोंदणी महानिरिक्षक व नियंत्रक मुद्रांक नियंत्रक पुणे
२२. व्यवस्थापकीय संचालक, मंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड.
२३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
२५. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
२६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२७. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
२८. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, मुंबई.
२९. आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका, भिवंडी, जिल्हा ठाणे.
३०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, वरळी, मुंबई.
३१. जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे/ठाणे, मुंबई.
३२. सह जिल्हा निंबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहरमुंबई उपनगरे// ठाणे, मुंबई
३३. सह पोलिस आयुक्त वाहतूक, मुंबई/ठाणे.
३४. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई.
३५. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
३६. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
३७. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, (बेस्ट), मुंबई.
३८. महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई
३९. महाव्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, ठाणे.
४०. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४१. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
४२. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४३. कार्यासन अधिकारी (नवि-२१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४४. निवड नस्ती (नवि-७).

(नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१६/प्र.क्र. १३९ /नवि-७, दि.२१ डिसेंबर, २०१७ चे सहपत्र)

परिशिष्ट १

मुंबई मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची ठळक वैशिष्टे

अ.क्र.	तपशील	
१	स्टँन्डर्ड गेज	१४३५ मि.मी.
२	मार्गाची लांबी	२४.९ कि.मी.
३	एकूण स्थानके	१७
४	गाडयांचे वेळापत्रक	वर्ष २०२१ - प्रति ५ मिनिटे वर्ष २०३१ - प्रति ४ मिनिटे
५	प्रस्तावित कार डेपो	१५ हेक्टर (कोनगाव एमआयडीसी)
६	इतर लागणारी जमीन	खाजगी - ३.२५ हेक्टर
७	तात्पुरती लागणारी जमीन (बांधकाम कालावधी दरम्यान)	६ हेक्टर
८	प्रकल्प राबविण्याचा कालावधी	ऑक्टोबर २०१७ ते मार्च २०२१ (४१ महिने)
९	मूळ किंमत [जमीन वगळून] (स्थापत्य काम, पुनर्वसन व पुनर्वसाहत, प्रणाली काम, सामान्य सल्लागार, आकस्मिक खर्चासह)	रु. ५१९७.५० कोटी
१०	जमिनीची किंमत (मूळ)	रु. ११२.५१ कोटी
११	आकस्मित खर्च [जमिनीकरीता (३%)]	रु. ३.३८ कोटी
१२	राज्यशासनाचा कर (मूळ)	रु. ७१६.४६ कोटी
१३	केंद्रशासनाचा कर (मूळ)	रु. ५९२.३८ कोटी
१४	प्रकल्पाची मूळ किंमत (सर्व करांसह)	रु. ६६२२.२३ कोटी
१५	दरवाढ	रु. १७७४.२८ कोटी
१६	बांधकाम दरम्यानचे व्याज	रु. २० कोटी
१७	प्रकल्प पूर्णत्वाची किंमत	रु. ८४१६.५१ कोटी
१८	आर्थिक अंतर्गत परतावा दर (EIRR)	१७.०९ %
१९	वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (FIRR with PD)	६.०२ %
२०	प्रवासी क्षमता (६ डब्यांची गाडी)	१) ६ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे - १७५६ प्रवासी क्षमता. २) ८ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे - २२४४ प्रवासी क्षमता.
२२	प्रतिताशी प्रतिदिशा प्रवासी संख्या (PHPDT)	वर्ष २०२१ - १७,९५७ वर्ष २०३१ - २६,१४३
२३	दैनंदिन प्रवासी संख्या (लक्ष)	वर्ष २०२१ - २.२९३ लाख वर्ष २०३१ - ३.०२५ लाख

परिशिष्ट- २

मुंबई मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाच्या प्रकल्पामध्ये प्राधिकरण आणि शासनाचा आर्थिक सहभाग –

अ.क्र.	आर्थिक सहभागी संस्था	तपशिल (प्रकल्प पूर्णत्वाच्या किंमतीवर)	पुर्णत्वाची किंमतीवर (रु. कोटीत)
१.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग	अ) स्थापत्य कामासाठी लागणारा खर्च तसेच सामान्य खर्च [स्थापत्य काम रु. ३२१२.३४कोटी + आराखड्याचा खर्च रु. ४३१.१३ कोटी = रु. ३६४३.४७ कोटी ब) बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) = रु. २० कोटी क) एकूण केंद्रीय कराकरीता रु. ९०८.४२ कोटी रुपयांचा ५०% = रु. ४५४.२१ कोटी	**४११७.६९**
२	**राज्य शासन सहाय्य:** केंद्र शासनाचे कर (५०%) आणि राज्य शासनाचे कर (१००%) **तसेच जमिनीची किंमत याकरीता व्याजासह परतफेड करावयाचे** दुय्यम कर्ज रुपाने राज्यशासनाकडून	अ) केंद्रीय कराकरीता रु. ९०८.४२कोटी रुपयांचा ५०% राज्य शासनाचा सहभाग = रु. ४५४.२१ कोटी ब) राज्य शासनाचा कर = रु. ७५१.०९ कोटी क) जमिनीची किंमत = रु. १४६.९३ कोटी	**१३५२.२५**
३	**प्रणालीची किंमत**		
	अ. कर्ज सहाय्य प्रणालीची किंमत ८०% (२९४६.५६)		२३५७.२५
	ब. उर्वरित २०% प्राधिकरणामार्फत		५८९.३१
	एकूण पूर्णत्वाची किंमत		**८४१६.५१**

आर्थिक सहभागाचा सारांश-

अ.क्र.	आर्थिक सहभागी संस्था	रक्कम (रु.कोटीत)
१	मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग (१ + ३ब)	४७०७.०१
२	राज्य शासनाचा सहभाग (२)	१३५२.२५
३	कर्ज सहाय्य	२३५७.२५
	एकूण	**८४१६.५१**

परिशिष्ट- ३

मुंबई मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाकरिता सुरुवातीचे भाडेदर तक्ता

मुंबई मेट्रो मार्ग - ५ ठाणे - भिवंडी - कल्याण या मार्गाकरीता सुरुवातीच्या भाडे दराचे टप्पे खालील प्रमाणे प्रस्तावित केले आहेत.

अंतर (कि.मी.)	० - ३	३ - १२	१२ - १८	१८ - २४	२४ - ३०	३० - ३६	३६ - ४२	>४२
भाडे (रु.)	१०	२०	३०	४०	५०	६०	७०	८०

मेट्रो मार्ग ५ ठाणे - भिवंडी - कल्याण या मेट्रो मार्गाचे सुरुवातीचे भाडेदर वर दर्शविल्यानुसार असून त्यापुढील भाडेदराकरीता भाडे निर्धारण समिती गठीत करण्यात येईल. उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार प्राधिकरणास देण्यात येत आहेत.

परिशिष्ट- ४

मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्रोत:-

ब. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमा च्या तरतूदीनुसार महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्पप राबविण्यात येणाऱ्या शहरात आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्कात १००% वाढ करण्यासाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या तरतूदीनुसार वसूल होणारी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

ड. मेट्रो कार डेपोच्या जागेचे वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

इ) मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या व्हायाडक्ट (viaduct), मार्गिकेंतील येणारे खांब, स्थानकांच्या नावांचे ब्रँडिंग, डेपो आणि स्थानकांवरील जाहिरात व पार्किंगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

सदर विविध स्रोतातून प्राप्त होणारा निधी हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर एका **"समर्पितनागरीपरिवहननिधीमध्ये"** ठेवण्याचे संकल्पित असून त्याचा विनियोग सदर मेट्रो प्रकल्पासाठी राज्यशासनाच्यावतीने लागणाऱ्या सहभागाची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्याकरीता तसेच कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपूरा पडत असल्यास स्वतंत्र पूरक निधी उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

****